IJCRT.ORG ISSN : 2320-2882
INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# महात्मा गांधीच्या सत्याग्रह व अहिंसा या संकल्पनेचे अध्ययन

**सहा.प्रा.नासीर कासम षेख**
राज्यषास्त्र विभाग प्रमुख
श्री विठ्ठल रूक्मिनी कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, सवना
ता.महागांव जि.यवतमाळ

**सारांष** :—

महात्मा गांधीनी सत्याग्रहाचा तंत्र मंत्र जनतेला षिकविला आहे. त्यामुळे अगदी निरक्षर स्त्री—पुरूश युवक स्वातंत्र्य लढ्यात प्रत्यक्ष सहभागी होवु षकले. विद्यार्थी, व्यावसायिक, कामगार, षेतकरी सर्वांसाठी सत्याग्रह उपलब्ध होता. सत्याग्रह ही गांधीची जगाला अपूर्व देणगी आहे. गांधीजीच्या निर्णयानंतर पंडीत जवाहरलाल नेहरू म्हणाले होते. एक भव्य तेज मावळले आहे आमची जीवने उजळविणारा आणि त्यात उब निर्माण करणारा सुर्य अस्तास गेला आहे. आम्ही अंधारात आणि थंडीत कुडकुडत आहोत. एकुणच महात्मा गांधीजीची सत्याग्रहाची कल्पना ही नैतीक अध्यात्मिक तसेच नाविण्यपूर्ण असुन अन्यायाचा प्रतिकार करण्याचे ते एक प्रभावी साधन आहे. सत्याग्रहाला गांधीजी जीवन प्रणाली मानत त्यांच्या मते सत्यासाठी केली जाणारी सत्याग्रह ही एक तपस्या असुन अहिंसात्मक मार्गाने सत्याच्या जवळ जाणारी ती एक प्रक्रिया आहे. थोडक्यात गांधीजी म्हणतात जर सारे राश्ट्र सत्याग्रह हेच आपले कायमचे षस्त्र असे ठरवीत तर आमच्या सर्व हालचालींना निराळेच रूप येईल. सत्यग्रहात जेवढी राश्ट्राची सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रगती मला दिसते तेवढी दुसरी कषातच दिसत नाही.

महात्मा गांधीचे अहिंसा व सत्याग्रह विशयीचे तत्वज्ञान सैध्दांतीक स्वरूपाचे नसले तरी मानव जातीच्या कल्याणाकरीता अत्यंत उपयुक्त आहे. प्रेमाने प्रेम वाढत जाते. ही महात्मा गांधीची खरी षिकवण होय. सध्याच्या काळात जगाचा विचार केल्यास हाणामारी, खुन, बलात्कार इत्यादी व्दारे दिवसांगणिक हिंसा वाढत आहे. जगाला विनाषाकडे आपण ढकलत आहोत. यातुन बाहेर पडण्याचा मार्ग गांधीजीच्या अहिंसेमध्ये आहे. अहिंसा ही मानवातील स्वार्थ, क्रोध, वासना, व्देश इत्यादी वाईट गुणांचा विकास करते. अहिंसेमुळै या व्यक्तीला उन्मत करीत नाही. किंवा पराभवाने वैफल्यग्रस्त होवु देत नाही. अहिंसेच्या प्रचंड षक्तीपुढे हिंसा पराभुत होते. अहिंसा अन्याय निवारण्याचे प्रभावी अमोघ अस्त्र आहे. अहिंसेच्या मार्गाने गेले तरच चिरषांतता लाभेल. हिंसेकडुन अहिंसेकडे जाणे यातच मानवाचा खरा विकास आहे.

**प्रस्तावना** :—

सत्य आणि अहिंसा महात्मा गांधीनी संपूर्ण देषाला दिलेली खरी देणगी आहे. सत्य, अहिंसा सत्याग्रहाच्या मागाने अन्यायाचा प्रतिकार करता येतो. महात्मा गांधीनी आपल्या विचार व कृतीतुन दाखवुन दिले आहे. त्यांनी आपले विचार निरनिराळ्या वेळी व परिस्थितीनुसार मांडले असुन आपल्या विचारांना परिपुर्ण न मानता जीवनाचा एक सिध्दांत म्हणुन त्यांना स्थान मिळवुन दिले.

अहिंसा किंवा प्रेम नुसती हत्या न करणे म्हणजे अहिंसा नव्हे. अहिंसेमध्ये प्रेमभावना मुख्य असते. क्षुल्लक जीव जीवाणुपासुन श्रेश्ठ मानवापर्यंत सर्वांभुती समानता असणे म्हणजे प्रेम हे ज्याला मान्य असेल त्याने अत्यंत हानीकारक गोश्ट करणाऱ्या माणसावर देखील राग न धरता प्रेम करावे. त्याची सेवा करावी व त्याचा उत्कर्श होईल अषी इच्छा धरावी. सत्य व अहिंसा हे दोन्ही आत्म्याचे गुण आहेत. आत्मसात षक्ती आहेत. अहिंसेच्या मार्गानेच सत्याप्रत पोहचता येते. इतरांना षारीरीक क्लेष पोहचविणे किंवा रक्तपात करणे म्हणजे हिंसा इतका मर्यादीत अर्थच गांधीजींना अभिप्रेत नव्हता. तर दुसऱ्यांचे मन दुखविणे म्हणजे ते हिंसाच समजत होते. गांधीजीची अहिंसा निविदात्मक, विधायक आणि निरपेक्ष स्वरूपाची

आहे. महात्मा गांधींनी दक्षिण अफ्रिकेत असतांना रंगभेद, संघर्श नश्ट करण्यासाठी अहिंसक सत्याग्रहाची चळवळ यषस्वी करून दाखविली. याच अहिंसक सत्याग्रहाच्या मार्गाने भारताला महात्मा गांधीनी स्वातंत्र्य मिळवुन दिले. अहिंसक सत्याग्रहाने समस्या सुटते आणि परस्परात मैत्री,प्रेमसंबध, सहकार्य विकसीत होतात.

**सत्याग्रहाचा अर्थ** :–

सत्याग्रह हा मुळ संस्कृत षब्द आहे. सत्य व आग्रह यांच्यापासुन तो सामाजिक षब्द तयार झाला असुन त्याचा अर्थ सत्याला चिकटून राहणे. सत्याला धरून असणे. सत्याचा आग्रह धरणे असा होतो. महात्मा गांधी म्हणतात की, सत्य सदैव स्वयंसिध्द असते. काही झाले तरी ते न सोडणे हेच सर्वांचे कर्तव्य आहे. सत्याग्रह करणाऱ्यांनी आपण खरोखरच सत्याचा षोध करीत आहोत काय ? हे स्वतःला विचारावे. तसे नसेल तर तुमचा आग्रह म्हणजे सत्याची विटंबना होईल. सत्य या षब्दाचे ही सत्य म्हणजे चांगले ते आणि जे षाष्वत ते असे अर्थ होतात.

महात्मा गांधीनी ज्या सत्याग्रहाचा प्रयोग केला त्यांचा सत्याग्रह समजुन घ्यावयाचा असेल तर त्यांच्या नैतिक किंवा धार्मिक समजुतीच्या पार्ष्वभुमीवरच तो समजुन घ्यावयास हवा, महात्मा गांधी जेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या राजकारणात षिरले तेव्हा त्यांच्या धर्मजीवनाची साधारण दिषा ठरली होती. आणि त्यातील काही तपषिल म्हणजे त्यांच्या काही धर्माचार स्थिर झाले होते. पुढे दक्षिण आफ्रिकेतील लढा चालवित असता त्यांना सत्याग्रहाचे साधन सापडले होते. आणि जगभर त्या साधनाचा ते विकास करीत राहीले. थोडक्यात आत्मीक बलाने षारीरीक बल जिंकण्याची, मानवाच्या परिवर्तनाची, सत्याग्रह ही एक विलक्षण प्रकिया होती. म्हणुनच इ. सन –1919 मध्ये हिंदुस्थानात सत्याग्रह सुरू झाला होता.

महात्मा गांधीच्या सत्याग्रहातुन अहिंसेचा उदय झाला असे दिसते पण याचा आषय असा नव्हे की ते रक्तपात किंवा हिसाचाराला घाबरत होते.

**सत्याग्रहा संबंधी महात्मा गांधीचे विचार** :–

सत्याग्रहाचा अवलंब करतांना रास्त उद्दिश्ट साधता येते. सत्याग्रह ही अत्यंत महान अषी षक्ती आहे. सत्याग्रहाने समाजातील राजकीय, आर्थिक आणि नैतीक अषा सर्व अनिश्ट प्रवृत्ती नाहीषा करता येतात. सत्य और अहिंसा के योग से तुम सारी दुनिया को अपने कदमोंमे गिरा सकते हो. सार रूप में सत्याग्रह और कुछ नही बल्की राजनितीक यांनी राश्ट्रीय जीवन में सत्य और षालीनता की प्रतिश्ठा है.

महात्मा गांधीजी म्हणतात सत्याचा मार्ग हा सर्वश्रेश्ठ मार्ग आहे. सत्याकडे जाण्याचे एकमेव साधन म्हणजे मन हेच होय. साधन अपुर्ण व ओबड धोबड असले तरी ते तितकेच आष्चर्यजनक ही आहे. आपली पंचेद्रीये ही मनाची साधने होत. ती मोठी उच्च प्रतीची आहेत. असे नव्हे पण आपल्याला विसंबुन राहले पाहिजे. पचेंद्रीय व मन यांच्या आरषातच आपल्याला सत्य पाहिले पाहिजे आणि सत्याचे प्रतिबिंब नीट उमटावे म्हणुन ती साधने स्वच्छ ठेवली पाहिजे. म्हणजेच षारीरीक व मानसिक अषा दोन्ही दृश्टीने आपले नवीन षुध्द व सुदृढ असले पाहिजे. षिस्त, संयम, अनासक्ती, स्वार्थ, त्याग, षांती, ध्येय आदी गुणांना सत्याग्रही जीवनात महत्वाचे स्थान आहे. तो याचसाठी वस्तुतः षुध्द व खंबीर चारित्र्य या भांडवलावरच सत्याग्रही आपले जीवन सुरू करतो.

**अहिंसे संबंधी महात्मा गांधीजींचे विचार** :–

मानवी कल्याणाचा एक मार्ग म्हणुन भारतामध्ये ऋशीमुनींनी अहिंसेच्या तत्वाचा पुरस्कार केला होता. परंतु अहिंसेच्या तत्वाचा गांधीजीनी लावलेला अन्वयार्थ आणि सततची युध्दे व रक्तपात यांनी वेढलेल्या जगाच्या हिताच्या दृश्टीने त्यांनी या तत्वाचा केलेला आग्रही पुरस्कार हे गांधींनी जगाला केलेले एक महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या दृश्टीने हिंसा हा पषुचा तर अहिंसा हा संस्कृत मानवाचा धर्म आहे. म्हणुन आचाराने, विचाराने किंवा उच्चाराने कोणाला ही न दुखावणे, कुणालाही इजा न करणे म्हणजेच अहिंसा असे त्यांचे मत होते. त्यांची अहिंसा म्हणजे दुर्बलता, असहाय्यता किंवा निश्क्रीयता नव्हती तर ते एक सर्वोच्च कोटीचे षौर्य होते. अहिंसेला गांधीनी प्रत्यक्ष कृतीव्दारे, आचरणाव्दारे आंमलात आणले. या मार्गावरून चालणे अतिषय कठीण व खडतर असते. या मार्गावर चालतांना पाय रक्तबंबाळ होतात. परंतु महात्मा गांधीनी आज यषस्वीपणे या मागील यष प्राप्त केले. समस्त विष्वाला त्यांनी हा मार्ग दाखविला. त्याचे अहिंसेचे व अस्त्र हृदयाच्या निर्मळतेतील आहे. जोपर्यंत आपले हृदय निर्मल होणार नाही तोपर्यंत आपण अहंकार, लालसा, इर्शा, प्रतिस्पर्धा, क्रोध यासारखे दुर्गण दुर होणार नाही. यावरच त्यांचा दृढ विष्वास होता. त्यांच्या मते अहिंसा हा प्रेमाचा प्रतिषब्द आहे. त्यामुळे प्रेमात ज्या गुणांचा समावेष होतो ते सर्व गुण अहिंसेत समाविश्ठ असतात. स्वतःच्या त्रासाची, कश्टाची पर्वा न करता

दुसऱ्याच्या सुखासाठी कार्य करणे हीच अहिंसेची खरी कसोटी होय असे ते मानत. म्हणुनच सर्व जगाने त्यांचे हे तत्व स्विकारलेले दिसते.

**गांधीजींच्या अहिंसेची पाच प्रत्यक्ष प्रमाण :–**

1. मानवी प्रयत्नांच्या आटोक्यात असलेली आत्मषुध्दी अहिंसेत अंतर्भुत असेल.
2. माणसांमाणसांमधील व्यवहाराच्या दृश्टीने विचार केला तर अहिंसेचे सामर्थ्य त्या अहिंसावादी व्यक्तीच्या अंगात जे षरीरबळ असते त्याच्या बरोबरीचे असते.
3. अहिंसा ही हिंसेपेक्षा निरपवाह श्रेश्ठ असते.
4. अहिंसेत पराभवाला स्थान नसते.
5. विजयानेच अहिंसेचा गोड षेवट होतो.

**निश्कर्श :–**

महात्मा गांधीच्या विचारसरणी सत्य व अहिंसा या दोन तंत्रांना महत्वाचे स्थान होते. राजकारणासह जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सत्य व अहिंसा या दोन बाबी त्यांना महत्वाच्या वाटत होत्या. गांधीजींच्या मते जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अहिंसेच्या तत्वांचे पालन केले पाहिजे. गांधीजींच्या सत्याचा प्रयोगामध्ये अहिंसेच्या तत्वास महत्वाचे स्थान होते.

सत्य हे साध्य व अहिंसा हे साधन असले तरी त्या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत असे ते म्हणत. कोणत्याही प्राण्याला विचार,उच्चार आणि आचार या तिन्ही दृश्टीनी न दुखावणे म्हणजे खरी अहिंसा होय असे ते म्हणत.

**संदर्भ ग्रंथ सुची :–**


1. पंडीत नलीनी, –गांधी – ग्रंथाली प्रकाषन मुंबई –2006.
2. मुरणकर लता, – महात्मा गांधी आणि परिवर्तन स्वप्न आणि वास्तव.
3. पाटील वि.भा. – भारतीय राजकीय विचारवंत – मंगेष प्रकाषन, कोल्हापुर.
4. ताटके अरविंदा – महात्मा गांधी – सरीता प्रकाषन पूणे – 1994.
5. रामलाल विवेक, – महात्मा गांधी जीवन और दर्पन – पंचषिल प्रकाषन, जयपुर–2004.
6. अजमेरा सुर्यकांता – महात्मा गांधीची विचारधारा – अथर्व पब्लिकेषन, जळगांव – 2011.
7. पाटील डी.आर. – महात्मा गांधी विचार व समकालीन विचार – अथर्व पब्लिकेषन, धुळे.
8. गोखले द.न., – गांधीजी मानव नी महामानव, मौज प्रकाषन, मुंबई – 2004.